J-e

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**परिपत्रक २०२०-२१**

**क्रमांक: प्रले/वित्त/ नप्र/ ५२ दिनांक: ०८.०६.२०२०**

**विषय :** कोविड-१९ संबंधित कर्तव्य बजावताना कोव्हीडमुळे मृत्यू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सानुग्रह सहाय्य लागू करण्याबाबत

**संदर्भ :** १) प्रले/वित्त/ नप्र/०१ दिनांक: १७.०४.२०२०
२) प्रले/वित्त/नप्र/५१ दिनांक: १९.०५.२०२०
३) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०२०/ प्र.क्र.४/ व्यय- ९ दिनांक २९.०५.२०२०

करोनाच्या सार्वत्रिक साथीमध्ये कोव्हीड -१९ संबंधित कर्तव्य बजावताना कोव्हीडमुळे मृत्यू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये निर्देश प्रसारित करण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त संदर्भित क्रमाक ३ या शासन निर्णयानुसार सानुग्रह सहाय्याची योजना सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य शासकीय सार्वजनिक उपक्रम यांचेकडून राबविण्यात येईल, असे निदेश आहेत. त्या अनुषंगाने करोनाच्या सार्वत्रिक साथीमध्ये सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार व मदत कार्य यांच्याशी संबंधित कर्तव्य बजावित असताना बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध प्रवर्गातील कामगार/कर्मचारी (प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत कोव्हीड -१९ शी सामना करणारे आरोग्य कर्मचारी यांचा विमा योजनेअंतर्गत अंतर्भाव असल्याने, ते वगळता) आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कंत्राटी कामगार /बाहय स्त्रोतांद्वारे घेतलेले/रोजंदारी/तदर्थ/मानसेवी कर्मचारी यांचा करोना विषाणुशी जवळून संबंध येत आहे. त्याअनुषंगाने कोव्हीड -१९ च्या सार्वत्रिक साथीशी लढा देण्यासाठी सक्रिय राहून कर्तव्य बजावणाऱ्या अशा कामगार/कर्मचाऱ्यांना पाठबळ देण्याच्या दृष्टीकोनातून व अशा कामगार/कर्मचाऱ्यांचा दुर्देव्याने मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी मान.महापालिका आयुक्त यांनी स्थायी समिती / महानगरपालिका यांच्या कार्योत्तर मंजुरी सापेक्ष निम्नलिखित वैशिष्टये असलेली सानुग्रह सहाय्य योजना लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**<u>वैशिष्टये :</u>**

१. सानुग्रह सहाय्य योजना कोव्हीड -१९ च्या अनुषंगाने सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार व मदत कार्ये या कार्यवाहिशी संबंधित कर्तव्यावर कार्यरत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध प्रवर्गातील कामगार / कर्मचारी (प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत कोव्हीड -१९ शी सामना करणारे आरोग्य कर्मचारी यांचा विमा योजनेअंतर्गत अंतर्भाव असल्याने, ते वगळता) आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कंत्राटी कामगार/बाहय स्त्रोतांद्वारे घेतलेले/ रोजंदारी/ तदर्थ/ मानसेवी कर्मचारी यांना कोव्हीड -१९ संबंधित कर्तव्य बजावताना कोव्हीड -१९ मुळे मृत्यू झाल्यास त्या सर्व प्रकरणी रु.५० लाख रकमेचे सानुग्रह सहाय्य खालील अटींच्या आधीन लागू असेल.

   i) सदर कामगार / कर्मचारी त्यांच्या इस्पीतळात दाखल होण्याच्या अथवा मृत्यूच्या दिनांकापूर्वी १४ दिवसांच्या काळात कर्तव्यावर हजर असला पाहिजे व ही बाब संबंधित विभाग प्रमुख / खाते प्रमुख यांनी सत्यपित प्रमाणित करणे आवश्यक असेल.

   (false negative)

   ii) ज्या प्रकरणांमध्ये कोव्हीडची चाचणी झालेली नाही किंवा कोव्हीडच्या चुकीच्या निगेटीव्ह अहवालाची शक्यता वाटत असेल अशा प्रकरणांमध्ये महानगरपालिकेने सर्व अधिष्ठातांची समिती स्थापन करण्यात येईल. सदर समितीने मेडीकल केस पेपर्स आणि केस हिस्ट्री यांची पडताळणी करून मृत्यू कोव्हीडने झाला आहे किंवा नाही याच्या शक्यतेबाबत निर्णय घेईल. सदर समितीचा निर्णय हा अंतिम व बंधनकारक असेल.



Scanned with CamScanner

iii) सदर मृत्यू कोव्हीड -१९ शी संबंधित असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणन, शासकीय / महानगरपालिका, आय.सी.एम.आर. नोदंणीकृत खाजगी इस्पीतळ/प्रयोगशाळा यांच्याकडून प्राप्त अहवालाच्या आधारे करण्यात येईल.

iv) सदरहू योजना दिनांक ०१ मार्च २०२० ते दिनांक ३० सप्टेंबर २०२० पर्यंत लागू असेल.

२. सर्व कामगार / कर्मचाऱ्यांवर कोव्हीड -१९ शी संबंधित सर्व उपचार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णांलयांमध्ये मोफत करण्यात येतील.

३. कोव्हीड -१९ संबंधित कर्तव्य बजावताना कोव्हीडमुळे मृत्यू झाल्यास, खालील दस्ताऐवजांसह अर्ज करणे आवश्यक असेल.

i) अर्ज

ii) मृत कामगार / कर्मचाऱ्याचे ओळखपत्र (प्रमाणित प्रत)

iii) दावा कर्त्यांचा ओळख पुरावा (प्रमाणित प्रत)

iv) मृत कामगार / कर्मचारी व दावा कर्ता दरम्यानच्या संबंधाचा पुरावा (प्रमाणित प्रत)

v) कोव्हीड -१९ ची चाचणी पॉझिटिव्ह असल्याबाबतचा प्रयोगशाळेचा अहवाल (प्रमाणित प्रत) / कोव्हीडची चाचणी झालेली नाही किंवा कोव्हीडच्या चुकीच्या निगेटीव्ह अहवालाची शक्यता आहे अशा प्रकरणामध्ये महानगरपालिकेचे सर्व अधिष्ठात मिळून जी समिती स्थापन होईल त्या समितीचा अहवाल.

vi) ज्या रुग्णालयात मृत्यू झाला त्या रुग्णालयाचा मृत सारांश

vii) मृत्यू प्रमाणपत्र (मूळ प्रत)

viii) बृहन्मुंबई महानगरपालिकेने कंत्राटी कामगार तसेच बाहय स्त्रोतांद्वारे घेतलेले / रोजंदारी / तदर्थ / मानसेवी कर्मचारी यांची थेट नियुक्ती केली असल्यास संबंधित खाते प्रमुखाचे प्रमाणपत्र व सामाजिक संस्था / ठेकेदार यांचे मार्फत नियुक्ती झाली असल्यास ज्या कामाकरिता नियुक्ती केलेली आहे, त्या कामाच्या अनुषंगाने मनपा कार्यालयात जमा केलेल्या वर्कमॅन कॉम्पेनसेशन पॉलिसी, संस्था नोंदणी प्रमाणपत्र, ई.एस.आय. योजना (प्रमाणित प्रत)

सानुग्रह सहाय्यकरिता दावा करणाऱ्या दावेदाराने अर्जासह वरीलसर्व प्रमाणपत्रे जोडून संबंधित खात्याकडे अर्ज सादर करणे, खात्याने अर्जाची पडताळणी करुन दावा तयार करून खाते प्रमुखाच्या मान्यतेने प्रमुख कर्मचारी अधिकारी या खात्याकडे वर्ग करणे. तदनंतर प्रमुख कर्मचारी अधिकारी या खात्यामार्फत सदर अर्जाची परिपत्रकात नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने छाननी / पडताळणी करणे व अर्जासह दावा प्रमुख लेखापाल (वित्त) खात्यातील संबंधित लेखा विभागाकडे अधिदानाकरिता अग्रेषित करणे आवश्यक असेल.

प्रस्तुत खर्चासाठी अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष प्रमुख लेखापाल (वित्त) कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे सूचित करण्यात येईल.

सर्व सहाय्यक आयुक्त / खाते प्रमुख यांनी कोव्हीड -१९ च्या संबंधित कर्तव्य बजावताना कामगार/ कर्मचाऱ्यांचा कोव्हीड -१९ मुळे मृत्यू झाल्यास व या परिपत्रकात नमूद केलेल्या वैशिष्ट्यांची पूर्तता होत असल्यास योजनेची काटकोरपणे अंमलबजावणी करावी.

(प्रदिप पडवळ)
प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.

(मिलीन सावंत)
मान.उपायुक्त (सामान्य प्रशासन)

(पी.वेलरासू)
मान. अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)

(इ.सिं.चहल)
मान. महानगरपालिका आयुक्त



Scanned with CamScanner